राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या अधिष्ठाता यांच्या दैनंदिन शासकीय कामकाजाकरिता एक चारचाकी वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांकः वाहन-०७२६/प्र.क्र.२७१/ई-१७७४९८७/प्रशा-२

गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख : २९ जुलै, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
२) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र: भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दिनांक २८.०७.२०२०.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: शापसे-३४२२/प्र.क्र.७८/का.३१, दिनांक ०१.०६.२०२३.
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ई-१०२२४६४८, दिनांक १३.०५.२०२६
६) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. DMER-२२०११/२२८/२०२६-PROC१, दिनांक १८.०७.२०२६.

प्रस्तावना :-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या अधिष्ठाता यांना दैनंदिन शासकीय, प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजासाठी तसेच विविध शासकीय कार्यालयांशी समन्वय साधण्यासाठी वारंवार प्रवास करावा लागतो. संस्थेच्या शेंडा पार्क परिसरामध्ये विविध इमारतींचे बांधकाम व नवीन रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने अधिष्ठाता यांना पाहणी दौरे करावे लागतात. तसेच, मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचेकडे होणाऱ्या बैठकांकरिता मुंबई येथे वारंवार उपस्थित राहणे आवश्यक असते. संदर्भाधीन क्र. ६ च्या पत्रान्वये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी सदर संस्थेच्या अधिष्ठाता यांच्या शासकीय कामकाजासाठी एक चारचाकी वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०१.०६.२०२३ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या खाजगी पुरवठादारांच्या पॅनेलमधील सेवापुरवठादारांकडून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर येथील अधिष्ठाता यांच्या दैनंदिन शासकीय कामकाजासाठी एक चारचाकी वाहन (XCENT / SWIFT DEZIRE / HONDA AMAZE) भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या रुपये ५३,०००/- प्रति महिना प्रमाणे रुपये ६,३६,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख छत्तीस हजार फक्त) (वस्तू व सेवा कर वगळून) इतक्या वार्षिक खर्चास याद्वारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव व लेखाशिर्ष	वाहनाचा प्रकार	संख्या	प्रति महिना भाडे (रु.)	वार्षिक भाडे (वस्तू व सेवा कर वगळून)
१	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर (२२१०५०७७)	चारचाकी (Xcent/Swift Dzire/Honda Amaze)	१	५३,०००/-	६,३६,०००/-
	एकूण		१		६,३६,०००/-

२. सदर वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३ मे, २०२६ च्या शासन परिपत्रक मधील सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. यासाठी संबंधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) उपलब्ध असल्यास इलेक्ट्रिक वाहन (EV) ला प्राधान्य द्यावे. पॅनल मधील पुरवठादारांकडून EV/hybrid पर्याय उपलब्ध आहे का याची खात्री करावी.

ब) शासकीय बैठका, प्रशिक्षण, सेमिनार, चर्चासत्रे इत्यादींसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा जेणेकरुन प्रवास व वाहनांचा वापर कमी होईल. विद्यापीठे/महाविद्यालयांनी याचे पालन सुनिश्चित करावे.

क) एकत्रित दौरे/स्थळभेटींसाठी carpooling चे नियोजन करावे व वाहनांचा कमीत कमी वापर करावा.

ड) वरिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस मेट्रो/लोकल/सार्वजनिक बसने प्रवास करावा (जेथे शक्य असेल).

इ) कार्यालयीन कामकाजात वाहनांचा वापर कमीत कमी ठेवावा, अनावश्यक स्थळभेटी टाळाव्यात व दैनंदिन वापरासाठी बाह्यस्त्रोताव्दारे घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य द्यावे.

३. सदर संस्थेस उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या वाहनाचा भाडे व त्यावरील वस्तू व सेवा कर खर्च राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर (२२१०५०७७)

लेखाशिर्षाखाली "(१३) कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखालील उपलब्ध निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांनी सेवापुरवठादाराशी संस्थास्तरावर नियमांनुसार करारनामा करावा.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा झाल्यास अथवा त्यामध्ये नमूद दर, अटी व शर्तींमध्ये बदल झाल्यास तसेच मुदतवाढ देणे किंवा सेवापुरवठादारामध्ये बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, त्यानुसार सुधारित आदेश निर्गमित करण्यासाठी संबंधित प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१.०६.२०२३ च्या शासन निर्णयानुसार पॅनेलमधील सेवापुरवठादारांनी वाहन उपलब्ध करून देण्यास असमर्थता दर्शविल्यास, संबंधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यासाठी संस्थास्तरावर निविदा प्रक्रिया राबवून त्यामधून प्राप्त होणाऱ्या न्यूनतम दरास शासनाची मान्यता प्राप्त करावी.

७. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग दोन, अनुक्रमांक-१३, नियम क्र. ६० व ६१ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२९१७१०४६६०५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.07.29 18:13:56 +05'30'

(म. गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर
५. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
६. निवडनस्ती (प्रशा-२).